सन २०१८-१९ करिता राष्ट्रीय कृषि विकास योजना-रफ्तार या योजनेंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गाकरीता ₹२२.८५५ कोटी निधी वितरीत करणे.

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांक: राकृवि ०११८/प्र.क्र. ३२(भाग-२)/१४-अे

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १५/१०/२०१८

संदर्भ :

१. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र०.४१८/प्र.क्र.१५५-१४/अे, दि .२७ २०१७/०४/
२. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२/०४/२०१८
३. कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, केंद्रिय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. ७-१/२०१८- आरकेव्हीवाय, दि. १४/०५/२०१८
४. राज्य स्तरीय प्रकल्प मंजूरी समितीच्या (SLSC) २५ व्या बैठकीचे इतिवृत्त- पत्र क्र. आरकेव्ही-०५१८/प्र.क्र.१६२/१४-अे, दि. २७ ऑगस्ट, २०१८, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
५. कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, केंद्रिय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. १-१५/२०१८ आरकेव्हीवाय, दि. ०६/०९/२०१८
६. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. राकृवि ०११८/प्र.क्र. ३२/१४-अे, दि.१५/०९/२०१८
७. आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय क्र. बीयुडी-२०१८/प्र.क्र. ११/कार्यासन.६, दि.०१/१०/२०१८

प्रस्तावना :

राष्ट्रीय कृषि विकास योजना - रफ्तार ही योजना केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे ६०:४० प्रमाणात अर्थसहाय्याने राबविण्यात येत असून या योजनेंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी केंद्र शासनाने संदर्भांकित दि. १४/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्रास सन २०१८-१९ करिता एकूण ₹४५.७१ कोटी (केंद्र हिस्यासाठी ₹२७.४३ कोटी व राज्य हिस्यासाठी ₹१८.२८ कोटी असे एकूण ₹४५.७१ कोटी नियतवाटप (Allocation) मंजूर केले. सदर नियत वाटपाच्या अनुषंगाने संदर्भांकित दि.१५ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये योजनेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

केंद्र शासनाने संदर्भाधिन दि.०६ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या पहिल्या हप्त्याव्दारे ₹१३.७१५ कोटी निधी वितरीत केला आहे, त्यास अनुसरुन राज्य हिस्याचा ₹९.१४ कोटी निधी वितरण आवश्यक आहे.

अशाप्रकारे, पहिल्या हप्त्यातील केंद्र हिस्याकरिता समरुप राज्य हिस्याचा आवश्यक ₹ ९.१४ कोटी निधी आणि केंद्र हिस्स्याचा ₹ १३.७१५ कोटी निधी असा केंद्र व राज्य हिस्याचा मिळून एकूण ₹२२.८५५ कोटी निधी विभागास उपलब्ध आहे. आदिवासी विकास विभागाने संदर्भांकित शासन निर्णय दि.०१.१०.२०१८ अन्वये केंद हिश्श्याचा ₹ १३.७१५ कोटी व राज्य हिस्स्याचा ₹ ९.१४ कोटी निधी कृषि विभागास वितरित केला असून, सदर निधी आयुक्त (कृषि) यांना वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णयः

१. या शासन निर्णयान्वये सन२०१८ -१९ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजना - रफ्तार या योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता केंद्र व राज्याच्या ६०:४० अर्थसहाय्याच्या प्रमाणात एकूण ₹ २२.८५५ कोटी (बावीस कोटी पंच्याऐंशी लाख पन्नास हजार फक्त) आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे पुढीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत-

(रक्कम ₹ कोटी)

अ. क्र.	योजनेचे नाव	अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता मंजूर निधी (६०:४०)		
		केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा	एकूण
१.	राष्ट्रीय कृषि विकास योजना - रफ्तार - सर्वसाधारण राकृवियो (Normal RKVY)	१३.७१५	९.१४	२२.८५५

२. परिच्छेद क्र. १ मध्ये नमूद केल्यानुसार, राष्ट्रीय कृषि विकास योजना - रफ्तार या योजनेंतर्गत केंद्र हिस्याचा ₹१३.७१५ कोटी (रुपये तेरा कोटी एकाहत्तर लाख पन्नास हजार फक्त), आणि राज्य हिस्स्याचा ₹ ९.१४ कोटी (रुपये नऊ कोटी चौदा लाख फक्त) असा एकूण ₹ २२.८५५ कोटी (रुपये बावीस कोटी पंच्याऐंशी लाख पन्नास हजार फक्त) निधी उपलब्ध करुन दिला असून तो योजनेच्या केंद्र व राज्य हिस्स्याच्या पुढील लेखाशिर्षांतर्गत सन २०१८-१९ मध्ये अर्थसंकल्पित केलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा -

प्रवर्ग	केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा
अनुसूचित जमाती	मागणी क्रमांक टी -५ २४०१- पीक संवर्धन ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) (२८) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य (पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजना) (केंद्र हिस्सा ६० टक्के) (२४०१ A७४४) ३३-अर्थसहाय्य	मागणी क्रमांक टी -५ २४०१- पीक संवर्धन ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना ०१- जनजाती उपयोजनेंतर्गत योजना (०१) (२९) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य (राज्य हिस्सा ४० टक्के) (२४०१ A७५३) ३३-अर्थसहाय्य

३. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेल्या ₹ २२.८५५ कोटी रक्कमेचे कोषागारातून आहरण व वितरणाकरिता सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे .

४. सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध झालेली ₹ २२.८५५ कोटी रक्कम कोषागारातून आहरित करुन आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नावे उघडण्यात आलेल्या स्वीय प्रपंजी लेखा खाते (Personal Ledger Account) मध्ये जमा करावी व तसे शासनास अवगत करावे आणि तद्नंतर सदर निधी संबंधित प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी विविध अंमलबजावणी यंत्रणांना वर्ग करण्यात यावा.

५. या शासन निर्णयासोबत परिशिष्ट-अ मध्ये प्रकल्पनिहाय / अंमलबजावणी यंत्रणानिहाय निधीचे वितरण दर्शविले आहे, त्यानुसार आयुक्त (कृषी) यांनी योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पांना ₹ २२.८५५ कोटी निधीचे अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता वितरण करावयाचे आहे.

६. उपरोक्त मंजूर निधीचे तात्काळ उपयोजन होण्याच्यादृष्टीनेच कोषागरातून आहरण करावे आणि सर्व विभागांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या निधीचा तात्काळ विनियोग करावा, अंमलबजावणी यंत्रणांनी निधी उपयोजनाविना बँक खात्यामध्ये जमा करुन ठेवू नये.

७. राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सन २००७-०८ पासून सन २०१७-१८ पर्यंत विविध विभागांना वितरीत केलेल्या निधीचे लेखापरीक्षण होऊन तसे प्रमाणित केल्यानंतर सदर योजनेंतर्गत उर्वरीत निधी दुसऱ्या टप्प्यामध्ये केंद्र शासनाकडून वितरीत करण्यात येणार आहे, त्यामुळे सर्व अंमलबजावणी यंत्रणांनी/ विभागांनी त्यांना सन २००७-०८ ते सन २०१७-१८ या कालावधीत वितरीत केलेल्या निधीचे सनदी लेखापालांकडून लेखापरिक्षण झाल्याचे प्रमाणित करावे.

८. कृषि विभागाच्या राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पांची उन्नत शेती - समृद्ध शेतकरी॰ या मोहिमेच्या संदर्भांकित दि. १३ एप्रिल, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार अंमलबजावणी करावी.

९. या शासन निर्णयान्वये केवळ - अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता निधी वितरीत करण्यात आला असून सर्व विभागांनी / अंमलबजावणी यंत्रणांनी त्यांना मंजूर केलेल्या प्रकल्पांतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आवश्यक असलेल्या निधीकरिता उपरोक्त रकमेचा विनियोग करावा.

१०. वैयक्तिक लाभाच्या प्रकल्पांतर्गत सर्व विभागांनी / अंमलबजावणी यंत्रणांनी लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (DBT) अनुदान वितरीत करावे.

११. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२/०४/२०१८ नुसार विहीत केलेल्या अटींची पुर्तता होत असल्याने तसेच, सदर परिपत्रकानुसार या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८१०१५१६१३४७०१०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सहपत्र :- परिशिष्ट - अ

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2018.10.15 16:30:51 +05'30'

(श्रीकांत चं. आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव (पदुम व पणन), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सचिव (जलसंधारण), मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. व्यवस्थापकीय संचालक (MSHMPB), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे
१०.आयुक्त (पशुसंवर्धन), औंध, पुणे
११.आयुक्त (दुग्धव्यवसाय), वरळी, मुंबई
१२.आयुक्त (मत्स्यव्यवसाय), मरीन ड्राईव्ह, मुंबई
१३.महासंचालक, महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, भोसले नगर, पुणे.
१४.संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१५.संचालक (प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१६.संचालक (रेशीम), विभागीय आयुक्तालय परिसर, सिव्हील लाईन्स, नागपूर
१७.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे

१८.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे
१९.महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई.
२०. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
२१.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२२.सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
२३.वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई
२४.मा. मंत्री (कृषि व फलोत्पादन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२५.निवड नस्ती.

परिशिष्ट - अ

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्र. राकृवि-०११८/प्र.क्र.३२(भाग-२)/१४-अे, दि. १५/१०/२०१८ चे सहपत्र

वर्ष-२०१८-१९ **(रक्कम ₹ कोटी)**

अ. क्र.	प्रकल्पाचे नांव व अंमलबजावणी यंत्रणा	प्रकल्प मंजूरीचे वर्ष	प्रकल्पांची मंजूर / उर्वरित प्रकल्प किंमत (नवीन / जुने प्रकल्प) (राकृवियो हिस्सा)	सन २०१८-१९ करिता मंजूर नियतवाटप (Allocation)	अनुसूचीत जमाती प्रवर्गाकरिता वितरित करण्यात येत असलेला निधी
१	२	३	४	५	६
१	उन्नत शेती - समृद्ध शेतकरी मोहिम अंतर्गत यांत्रिकीकरण प्रकल्प	२०१८-१९	१००.००	१००.००	११.३१
२	कांदाचाळ उभारणी प्रकल्प	२०१८-१९	१५०.००	१२५.००	७.५४५
३	संरक्षित शेती प्रकल्प	२०१८-१९	१५०.००	७५.००	४.००
	आयुक्त (कृषि)	**एकूण**	**४००.००**	**३००.००**	**२२.८५५**